# अध्यक्षीय लोकशाही

२ मार्च २००४ च्या दैनिक सकाळ मधील श्री प्रकाश अकोलकरांचा 'अध्यक्षीय पद्धतीच्या पर्यायावर विचार व्हावा' हा लेख वाचनात आला. दैनिक सकाळ मध्ये रोज निवडणुकीच्या अनुषंगाने कलाकारोचे भारतिय राजवटी बद्दल विचार प्रसिद्ध बोत आहेत. सर्वांचा सूर सद्य परिस्थितीत सुधारणाना खूप वाव आहे असाच आहे. अर्थात भारतातील सर्वांचेच हे मत असावे. परंतु, सुधारणा काय असाव्यात या बद्दल फारच कमी प्रमाणात लिहले आहे. सर्व प्रथम एक सत्य आपणा सर्वानी स्वीकारले पाहिजे. कोठलाही राजकीय प्रणाली आदर्श होऊ शकत नाही. कांही गुण कांही दोष प्रत्त्येक प्रणालीत असणारच. त्या मधील दोष कमी करणे किंवा त्यांचा प्रभाव नगण्य करणे हे ती प्रणाली राबवणाऱ्यांच्या हाती असते हे ठाम आहे. तेंव्हा त्या बाबत विचार करणे व उपाय करणे अगत्त्याचे आहे. सध्या 'तृप्तीच्या लाटेची' हूल उठवून व त्या आधारे सत्तारूढ व विरोधी पक्ष, दुसऱ्यापेक्षा आम्ही कसे श्रेष्ठ आहोत हे पटवण्याचा प्रयत्न करत आहेत. एकमेकांचे दोष दाखवीत आहेत. या मध्ये सोईस्कर पणे हे विसरले जाते की लोकाना 'तृप्तीची लाट' आहे हे सांगावयाची गरज का पडावी. सूर्य उगवला हे सांगावे लागते काय? लोक खरोखरच तृप्त असतील तर ते स्वतःच तसे सांगतील. या वादात न पडता सुधारणा कोणत्या व कशा कराव्यात या वर लोकानी आपले विचार मांडले पाहिजेत व त्या विचार मंथनातून अंतिम प्रणाली ठरवली पाहिजे. माझे म्हणणे पाहू या.

आपल्या सध्याच्या लोकशाही प्रणाली मध्ये कितीही दोष असले तरी आपणाला हे मान्य करावेच लागेलच की लोकानी आता पर्यंत या प्रणाली मुळेच सत्ते मध्ये बदल घडवून आणले. म्हणजेच शेवटी सत्ता मिळवण्याकरता राजकारण्याना लोकांच्याकडे जावेच लागते. लोकानी असेही दाखवून दिले आहे की ते आपल्या मताच्या हक्काचा उपयोग करू शकतात. जे दोष आहेत ते मुख्यत्त्वे करून निवडणुकेचा खर्च व व्यक्तिगत स्वार्था मुळे आले आहेत. या वर प्रभावी उपाय केले तर आपली लोकशाही प्रणाली जगात सर्वोत्तम होऊ शकते. लोकशाही प्रणाली आपल्या मातीतील आहे. आपण ती कोणाकडुन उसनी घेतली नाही. पंचायतीच्या निर्णया प्रमाणे वागण्याची आपल्याला हजारो वर्षांची सवय आहे. तेंव्हा पद्धत बदलण्या ऐवजी सुधारणा करण्यावर भर देणे आवश्यक आहे.

सारासार विचार केला तर सर्वांचा निवडणूक प्रचार खर्च जनताच करते हे सर्वच मान्य करतील. राजकीय पक्ष सत्तेत आल्यावर ठराविक कंपन्याना सवलती देवून त्यानी केलेल्या मदतीची सव्याज परतफेड करतात. आणि हे करताना कितीतरी जास्त जनतेचा पैसा खर्च होतो. म्हणून प्रचार पद्धत ठरवून लागणारा सर्व खर्च सरकारी तिजोरितूनच व्हावा. तो कमीतकमी व्हावा या करता नियम करावे लागतील. उदाहरणार्थ प्रचार हा पुस्तक , ऑडिओ/व्हिडिओ कॅसेट व सार्वजनिक सभा याच रूपाने केल्यास होणारा खर्च सरकार करेल. या मध्ये उमेदवाराची संपूर्ण माहिती, त्याच्या राजकीय पक्षाची माहिती त्यांची कामे हे सर्व ठराविक साच्यात असेल. ही माहिती काय असेल हे जागेअभावी खोलात जाऊन सांगत नाही, थोडक्यातच सांगतो. उमेदवार व त्याच्या नातेवाईकांची साम्पत्तिक स्थिति, त्याने केलेली पक्षांतरे, त्याने केलेली कामे, त्याने भोगलेल्या शिक्षा वगैरे. उमेदवाराला स्वार्थ बजूला ठेऊन राजकारण करण्यास भाग पाडले पाहिजे. त्या करता पूढारी हा जनसेवक समजला पाहिजे. त्याचे आयुष्य संपूर्णपणे उघडे असावयास पाहिजे. जनसेलकाला खाजगी आयुष्य असता कामा नये. त्याचे चारित्र्य स्वच्छ असलेच पाहिजे. डागाचा संशय आला तरी त्याची हकालपट्टी झाली पाहिजे. जेणेकरून फक्त समाज सेवकच राजकीरणात आले पाहिजेत, व्यवसाईक नकोत.

निवडणुकीला फक्त खरोखरचे समाजसेवकच रिंगणात उतरतील हे पाहण्या करताही नियम करावे लागतील. उदाहरणार्थ कमीतकमी सलग ६ वर्षे उमेदवाराने आपली निष्ठा बदलली नसावी, कमीतकमी ०.०१% लोकानी त्याच्या उमेदवारीला अनुमोदन दिले पाहिजे वगैरे.